दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ५ वे अंक ५३ गुरूवार दि.२८ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# आंदोलनाची परवानगी मिळाली, मनोज जरांगेंचं २० आश्वासनासह पोलिसांना हमीपत्र

मुंबई : गणेशोत्सवामुळे मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना मुंबईमध्ये येण्यासाठी प्रतिबंध घातला होता. मात्र आज (२७ ऑगस्ट) सकाळी सर्व विरोध झुगारून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचा ताफा मुंबईच्या दिशेने रवाना झाला. यानंतर मनोज जरांगे यांना आझाद मैदानावरील आंदोलनासाठी मुंबई पोलिसांनी अटीशर्तीसह परवानगी दिली आहे. आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी मिळताच मनोज जरांगे यांनी स्वत:च्या सहीने मुंबई पोलिसांना २० आश्वासनासह हमीपत्र दिलं आहे.

मनोज जरांगे यांनी हमीपत्रातून कोणती आश्वासने दिली?

कर्तव्यावर असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यावर त्यास दाखवण्यासाठी आंदोलनासाठी मिळालेली परवानगीची मूळ प्रत सोबत बाळगेल.

पोलीस नियमित संपर्क साधता येईल यासाठी पांडुरंग मारक या जबाबदार व्यक्तीची प्रतिनियुक्ती करेल

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी विचारविनिमय करून पिण्याचे पाणी (टँकरद्वारे पुरवठा करून) आणि प्रथमोपचार/वैद्यकीय मदत यांची सभास्थळी आणि धरणे/निदर्शन कालावधीत पर्याप्त व्यवस्था करेल.

मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे आणि निदर्शने इत्यादी सुव्यवस्थित रीतीने करण्यात येतील आणि वाहतुकीच्या सामान्य ओघामध्ये अडथळा आणणार नाही. तसेच वाहनतळ आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यात येईल.

मी आणि इतर व्यक्ती, धरणे आणि निदर्शने इत्यादीमध्ये सहभागी होणाऱ्यांची मर्यादा, माझ्या निवेदनात विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपर्यंतच मर्यादित ठेवील आणि कोणत्याही परिस्थितीत त्यात वाढ होऊ देणार नाही.



पोलिसांना सहाय्य करण्यासाठी पुरेशा संख्येतील स्वयंसेवकांना त्या स्थळी आणि त्या स्थळाभोवती तैनात करण्यात येईल. तसेच संपर्काच्या तपशीलासह स्वयंसेवकांची यादी आगाऊ स्वरुपात पोलिसांना पुरवली जाईल, याची मी आणि इतर आयोजक खात्री करतील.

मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शनं आणि सभा इत्यादी विहित ठिकाणी/स्थळीच घेण्यात येतील.

धरणे आणि निदर्शन इत्यादी विहित कालावधीत म्हणजेच सकाळी ०९:३० ते सायंकाळी ०५:३० या वेळेत घेण्यात येतील, याची मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील.

मी आणि इतर आयोजक ध्वजांसाठी/फलकांसाठी २ फुटांपेक्षा अधिक लांबीची काठी वापरणार नाही. ध्वजाचा/फलकांचा आकार ९ फूट ६ फूट किंवा त्यापेक्षा कमी असेल. तसेच सहभाग घेणाऱ्या व्यक्ती, काठीवरील ध्वज/फलक, इत्यादी केवळ प्रदर्शनाच्या हेतूनेच जवळ बाळगतील.

धरणे आणि निदर्शन इत्यादींमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती, आक्रमणकारी हत्यार म्हणून वापरले जाण्याचा संभव असतील अशा लाठ्या, अग्निशस्त्रे, भाले, तलवारी आणि इतर वस्तू जवळ बाळगणार नाहीत. मी याची खात्री करील की,सहभागी होणारी कोणतीही व्यक्ती, ज्यामुळे मानवी जीवितास किंवा त्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा सार्वजनिक शांतता भंग होईल किंवा दंगा उसळेल असे काणतेही नकली अग्निशस्त्र किंवा इतर कोणतेही अग्निशस्त्र जवळ बाळगणार नाहीत, याची मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील.

आंदोलनात सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती चिथावणीखोर भाषणे करणार नाही किंवा जमावाच्या भावना भडकवणारी किंवा त्यांना चिथावणी देणारी किंवा विविध गटांमध्ये धर्म, वंश, स्थान किंवा जन्म, निवास, भाषा, इत्यादी कारणावरून शत्रुत्व निर्माण करणारी किंवा तसा संभव असणारी भाषा वापरणार नाहीत. तसेच अशा गटांमधील सलोखा राखण्यास बाधक ठरणारी किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडविणारी अशी कोणतीही कृती कोणत्याही रीतीने करणार नाही, याची मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील.

धरणे आणि निदर्शन इत्यादीमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती, पोलीस आयुक्त, मुंबई यांनी किंवा कर्तव्यावर असलेल्या इतर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने, मेळावा किंवा धरणे/निदर्शने इत्यादीच्या कोणत्याही टप्प्यावर दिलेल्या सर्व कायदेशीर निदेशांचे तात्काळ अनुपालन करतील, याची मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील.

सहभागी होणारी कोणतीही व्यक्ती सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात येईल किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण होईल, जाळपोळ, इत्यादी होईल अशा रीतीने कोणतीही कृती करणार नाही किंवा इतर कायद्याचे उल्लंघन होईल, अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

आंदोलनात सहभागी होणाऱ्या व्यक्तीमुळे कोणत्याही धर्माचा किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीचा अपमान होईल, या उद्देशाने कोणतेही प्रार्थनास्थळ किंवा व्यक्तीच्या कोणत्याही वर्गाने पवित्र मानलेली कोणतीही वस्तू नष्ट करणार नाही. तिचे नुकसान करणार किंवा ती अपवित्र करणार नाही.

धरणे आणि निदर्शनाच्या विहित ठिकाणावरून कूच करण्याच्या अविर्भावात जाणार नाही. या कालावधीत, मी आणि इतर आयोजक पोलिसांच्या सूचनांचे/निदेशांचे अनुपालन करू.

मी आणि इतर आयोजक कोणत्याही प्रकारची कागदपत्रे, पुस्तके आणि प्रतिमा जाळणार नाही आणि अन्न शिजवण्यास, कचरा करण्यास घोषणा फलक, प्लास्टिक कचरा फेकण्यास प्रोत्साहन देणार नाही.

मी आणि इतर आयोजक याची खात्री करतील की, विनिर्दिष्ट परवानगीशिवाय, धरणे, निदर्शन, ध्वनिक्षेपकाचा किंवा जनसंबोधन यंत्रणेचा वापर करणार नाही. तसेच निर्देशित अधिकाऱ्याने परवानगी दिलेली असेल, त्यानुसार सकाळी ०९:३० ते सायंकाळी ०५:३० या वेळेतच केवळ ध्वनिक्षेपक वापरण्यात येईल.

ट्रॅक्टर, ढकलगाडी (ट्रॉली), बैलगाडी, सायकल-रिक्षा, हातगाडी यांसह कोणतीही वाहने किंवा पक्षी, घोडे, हत्ती, उंट, कोंबड्या, इत्यादीसारखे प्राणी धरणे, निदर्शने, इत्यादी ठिकाणी आणली जाणार नाहीत, याची मी आणि इतर आयोजक खात्री करतील.

## लातूर जिल्ह्यात आयुष्मान कार्ड व आयुष्मान वय वंदना कार्ड निर्मिती विशेष मोहीम

लातूर :- आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांचा मोफत उपचार १३५६ आजारांवर जिल्ह्यातील ५८ अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे. तसेच, आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत ७० वर्षे आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ५ लाख रुपयांचा मोफत उपचार मिळणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड आणि आयुष्मान वय वंदना कार्ड अत्यावश्यक आहे. यासाठी १६ ऑगस्ट २०२५ ते ७ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबवली जात आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ७.७७ लाख आयुष्मान कार्ड तयार झाले असून, उर्वरित नागरिकांनी त्वरित आपले कार्ड तयार करून घ्यावे. हे कार्ड बनविण्यासाठी अद्यावत शिधापत्रिका, आधार कार्ड आणि आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल क्रमांक, ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करण्यासाठी आधार कार्ड आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. नागरिक स्वतः गुगल प्ले स्टोअरवरून आयुष्मान ॲप डाऊनलोड






करून बेनिफिशियरी लॉगिनद्वारे कार्ड तयार करू शकतात. तसेच, आशा सेविका, सीएससी सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत ऑपरेटर, स्वस्त धान्य दुकान किंवा रुग्णालयातील आरोग्य मित्र यांच्याशी संपर्क साधून कार्ड बनविता येईल. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आयुष्मान कार्ड तयार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## राष्ट्रपती अन् पंतप्रधानांनी दिल्या देशवासियांना गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज देश-विदेशात राहणाऱ्या सर्व भारतीयांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. सोशल मीडियावर एक पोस्ट करत त्यांनी, हा महान सण ज्ञान आणि विवेकाचे देवता भगवान गणेश यांच्या जयंती म्हणून आनंदाने साजरा केला जातो. अडथळ्यांचा नाश करणारे भगवान गणेश यांना मी प्रार्थना करते की ते वैयक्तिक विकास आणि राष्ट्रनिर्मितीच्या मार्गातील सर्व अडथळे दूर करत राहतील आणि त्यांच्या आशीर्वादाने, सर्व देशवासी, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून, मजबूत भारताच्या निर्मितीमध्ये भक्तीने काम करत राहतील. गणपती बाप्पा मोरया. असे म्हणत त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील सोशल मीडियावर पोस्ट करत, गणेश चतुर्थीच्या तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा. श्रद्धा आणि भक्तीने भरलेला हा पवित्र प्रसंग सर्वांसाठी शुभ असो. मी भगवान गजानन यांना त्यांच्या सर्व भक्तांना आनंद, शांती आणि चांगले आरोग्य प्रदान करण्याची प्रार्थना करतो. गणपती बाप्पा मोरया. असे म्हटले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही दिल्या शुभेच्छा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी, गणेश चतुर्थीच्या पवित्र सणाच्या तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा. अडथळ्यांचा नाश करणारे भगवान गणेश आपल्या सर्वांच्या जीवनात आनंद, शांती आणि समृद्धी आणो. त्यांच्या आशीर्वादाने भारत एकता, सौहार्द आणि विकासाच्या मार्गावर प्रगती करत राहो. गणपती बाप्पा मोरया.असे म्हणत शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री योगी यांनी शुभेच्छा दिल्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पोस्ट करत, अडथळ्यांचा नाश करणारे भगवान गणेशाच्या पूजेच्या पवित्र सण 'श्री गणेश चतुर्थी' निमित्त सर्व भक्तांना आणि राज्यातील जनतेला हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. भगवान सिद्धिविनायक सर्वांना आनंद, समृद्धी आणि चांगले आरोग्य देवो, हीच माझी प्रार्थना आहे. गणपती बाप्पा मोरया.अशा शुभेच्छा दिल्या. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यांनी, श्री गणेश चतुर्थीच्या देशवासियांना हार्दिक शुभेच्छा. सर्व सिद्धींचे दाते, प्रथम पूजनीय भगवान गणेशाच्या आशीर्वादाने, प्रत्येक जीवनात शुभता राहो, आपले राष्ट्र सतत प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत राहो ही गौरीसुत श्री गणेशजींना प्रार्थना. ओम गण गणपते नम: असे म्हटले.



## बौद्धांनी येणाऱ्या जनगणनेत जातीचा उल्लेख न करता स्वाभिमानाने धर्माच्या रकान्यात फक्त बौद्ध म्हणूनच उल्लेख करावा!.- राजाभाऊ कदम

मुंबई : - डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेनं बौद्ध धम्माचा स्वीकार किरून शेकडो वर्षांच्या सर्वांगीण गुलामगिरीतून मुक्त झालेल्या बौद्ध बांधवांनी येणार्या जनगणनेत जातीचा उल्लेख न करता स्वाभिमानाने धर्माच्या रकान्यात फक्त बौद्ध म्हणूनच उल्लेख करावा असे आग्रही प्रतिपादन बौद्ध धम्माचे अभ्यासक मा. राजाभाऊ कदम यांनी केले.

दैनिक वृत्तरत्न सम्राटच्या वतीनं सर्वोदय बुद्ध विहार टिळक नगर,चेंबूर मुंबई येथे येणार्या जनगणनेच्या निमित्ताने मुख्य संयोजक कृपाल बबन कांबळे यांच्या पुढाकाराने आंबेडकरी विचारांचे साहित्यिक आणि विचारवंत यांच्या एका गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी राजाभाऊ कदम बोलत होते. राजाभाऊ आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,जातींचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारला कारण बौद्ध धम्मात कोणतीही जात नाही.परंतु बाबासाहेबांचे अनुयायायी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी शेड्युलकास्ट बनतात हे शहाणपणाचे लक्षण नव्हे.बौद्ध बनल्यावर बौद्धांच्या सवलती माझ्या कोटाच्या खिशात आहेत असे बाबासाहेब म्हणाले होते.परंतु त्यांच्या कोटाचा खिसा कोणता याचा शोध ७० वर्षात बाबासाहेबांचे अनुयायी लावू शकले नाहीत,ही शोकांतिका आहे.बौद्ध धम्म स्वीकारून शेड्युलकास्ट बनून राहायचे असेल तर तुम्ही हिंदू धर्मातच रहा कारण तिथे तुम्हाला शेड्युलकास्टचा दर्जा मिळलेलाच आहे.धम्म स्वीकारून धम्मात जाती आणून धम्माला जातींचा धम्म करून बदनाम करू नका. बाबासाहेबांना जातींचे उच्चाटन करून भारत बौद्धमय करायचा होता हे स्वतःच्या स्वार्थासाठी विसरू नका. त्यामुळे येणाऱ्या जनगणनेत जातीचा उल्लेख न करता फक्त स्वाभिमानाने बौद्ध लिहा.आणि धम्म स्वीकारून शेड्युलकास्ट बनण्यापेक्षा धार्मिक अल्पसंख्याक बना आणि सवलती घ्या. पूर्वाश्रमीच्या जातीचा उल्लेख न केल्याने आरक्षण मिळाले नाही तरी धार्मिक अल्पसंख्याकांसाठी असलेल्या घटनात्मक सोयीसुविधांचा लाभ आपण बुद्धिस्ट मायनॉरीटी म्हणून घेऊ शकतो असे प्रतिपादन शेवटी राजाभाऊ यांनी केले. याच आशयाची मते ड.विकी येवले,ड.किशोर कांबळे,प्रा. आनंद देवडेकर यानीही व्यक्त केली. उर्वरित बहुसंख्य वक्त्यांनी जनगणनेत महार जातीचा उल्लेख करावा असा सूर लावला होता.



दैनिक वृतरत्न सम्राटच्या संपादक निलिमाताई बबन कांबळे यांच्या अध्यक्षते खालील संपन्न झालेल्या या परिषदेचे उद्घाटन विपस्सनाचार्य भन्ते डॉ.राहुलबोधी यांच्या हस्ते झाले.त्यांनीही येणाऱ्या जनगणनेत धर्म बौद्ध व जातीच्या राखण्यात पूर्वाश्रमीची जात लिहा असे मत व्यक्त केले.

या गोलमेज परिषदेमागची भूमिका विशद करणारं प्रास्ताविक दैनिक वृत्तरत्न सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल बबन कांबळे यांनी केले.या परिषदेत अच्युत भोईटे,निवृत्त सनदी अधिकारी दिनेश डिंगळे,आनंद देवडेकर,गौतम सोनावणे,ड. किशोर कांबळे,ड.विकी येवले,अरविंद निकाळजे,प्रा.आशालता कांबळे,पुष्पा धाकतोडे,मीनल बच्छाव,लता परुळकर प्रा.संजय अभ्यंकर,संतोष आठवले,विभा राही, प्रा.देवराव मनवर,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## रमेश चक्रे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

रेणापूर / प्रतिनिधी :- श्रीराम विद्यालय रेणापुर येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, सेवानिवृत्त विक्रीकर उपायुक्त : रमेश बाबुराव चक्रे यांना मा. एकनाथ शिंदे ( उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ) यांच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यावेळी महाराष्ट्र राज्य मा.भरत शेठ गोगावले (रोजगार हमी, फलोत्पादन, खार जमीन विकास मंत्री ), तसेच मा. संजय शिरसाट, ( सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग ) यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.



# संपादकीय

## ‘डोनबास’साठी रशियाचा अट्टहास

गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या युक्रेन–रशिया युद्धाचा अंतिम टप्पा काय असेल, या प्रश्नाचे उत्तर लवकरच मिळणार, अशा आशा पल्लवित झालेल्या असतानाच ही दोन्ही राष्ट्रे एकमेकांवरील हल्ले थांबवण्यास तयार नसल्याचे समोर आले. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांचा मुख्य उद्देश हा युक्रेनच्या डोनबास प्रदेशाचा ताबा मिळवण्याचा आहे. हा परिसर जितका भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे, तितकाच तो आर्थिक, औद्योगिक आणि धोरणात्मक दृष्टीने महत्त्वाचा आहे.

व्ही. के. कौर, ज्येष्ठ विश्लेषक पूर्व युक्रेनमधील डोनबास क्षेत्र (ज्यामध्ये डोनेट्स्क आणि लुहान्स्क प्रांतांचा समावेश होतो) हे खनिज संपत्तीच्या प्रचंड साठ्यामुळे ओळखले जाते. येथे कोळसा, लोखंड, औद्योगिक खनिजे आणि मोठ्या प्रमाणावर गॅससाठा आहे. हा प्रदेश रशियासाठी केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर रणनीतिक दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. विश्लेषकांचे म्हणणे आहे की, जर हा परिसर पूर्णतः रशियाच्या नियंत्रणाखाली गेला तर पुतीन यांना एक असा भौगोलिक, आर्थिक आणि रणनीतिक झोन मिळेल, ज्यामुळे नाटो आणि पश्चिमी राष्ट्रेही कायमस्वरूपी अस्वस्थ राहतील. म्हणूनच पुतीन या भागासाठी आग्रही आणि ठाम आहेत.

२०१४ मध्ये क्रिमियाचे एकीकरण झाल्यापासून रशियाने या क्षेत्रात सतत समर्थक फुटीरतावाद्यांना शस्त्र आणि मदत पुरवून ताबा मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे डोनबासमधील युद्ध हे गेल्या दशकभरापासून सुरूच आहे. रशियाने डोनबासमधील फुटीरतावादी प्रजासत्ताकांना मान्यता दिली आहे. या भागात सुमारे ७५ टक्के लोकसंख्या रशियन भाषिक आहेत आणि सांस्कृतिक दृष्ट्याही स्वतःला रशियाशी जोडलेले मानतात. हीच सामाजिक आणि सांस्कृतिक मानसिकतेची बाजू या संघर्षाला मानवीय संकट बनवते. कारण, या मागणीनुसार जर युक्रेनमधून हे प्रदेश वेगळे झाले, तर लाखो लोक विस्थापित होतील किंवा पुन्हा रशियाच्या प्रभावाखाली जातील.

आज संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार या युद्धामुळे ३० लाखांहून अधिक युक्रेन नागरिक विस्थापित झाले आहेत आणि सुमारे ६० लाखांहून अधिक परदेशी निर्वासितांवर आश्रिताचे जीवन जगण्याची वेळ आली आहे. युक्रेनमधील झेलेन्स्की सरकारने अनेकदा स्पष्ट केले आहे की, जर डोनबासचा ताबा रशियाला दिला तर त्यानंतर पुन्हा युक्रेनच्या इतर भागांवर हल्ले होतील. त्यामुळेच झेलेन्स्की हा भाग देण्यास तयार नाहीत. या संपूर्ण घटनेत अमेरिकेची भूमिका महत्त्वाची ठरते. एकीकडे ट्रम्प सार्वजनिकरीत्या युक्रेनचे समर्थन करतात, तर दुसरीकडे ते २०२४ च्या निवडणुकीत विजयी होऊन २०२५ जानेवारीत पुन्हा राष्ट्राध्यक्ष बनल्यावर स्वतःचे युद्धविरामाचे करार व जागतिक पातळीवरील शांतीचे नायक होण्याचे स्वप्न पाहतात. ट्रम्प यांना शांततेच्या प्रयत्नामुळे नोबेल पारितोषिक मिळावे, अशी लालसा आहे आणि युक्रेन युद्ध संपवून त्यांना मोठा आंतरराष्ट्रीय गौरव हवा आहे. मात्र, प्रत्यक्षात अमेरिकेला युद्ध संपवण्यापेक्षा डोनबासच्या खनिजांवर स्वतःचा ताबा मिळवायचा आहे.

### अतिउत्साह नकोच!

ट्रम्प सार्वजनिकरीत्या शांततेचा पुरस्कार करताना दिसत असले, तरी आतून त्यांची आर्थिक भूमिका या खनिजांशी निगडित आहे. कारण, युक्रेन हा युरोपियन सीमारेषेवर उभा असलेला एक महत्त्वाचा देश आहे. डोनबासच्या नियंत्रणासाठी हे युद्ध केवळ लष्करी स्तरावर सीमित नाही, तर तंत्रज्ञान, आर्थिक, मानवीय आणि सांस्कृतिक लढाईचे स्वरूप घेऊन उभे आहे. जिथे रशिया इतिहासाच्या वारसाचे रक्षण करत आहे, तिथे युक्रेन राष्ट्राच्या अस्तित्वाचे रक्षण करण्याचा दावा करत आहे. पश्चिमी राष्ट्रे व नाटो देशांसाठीही हा एक निर्णायक टप्पा आहे.

# गणपती बाप्पा : विघ्नहर्ता ते मंगलकर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे.स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे ‘जीवनगौरव पुरस्कार’ ज्येष्ठ पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो. लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर ‘केसरी’तून लेख करतानांही टिळकांनी आर्यांचे वस्तिस्थान ‘ओरायन’ शास्त्रीय पंचांग ‘गितारहस्य’ असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढयाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सावाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य–असत्याचा, पाप–पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध: पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्या वर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सहृदयता, सज्ञनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो ‘मी’ ऐवजी ‘आपण’ ‘माझे’ ऐवजी ‘आपले’ असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे.

भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत: च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत, त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने, प्रतिमेने, विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो, म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते.

बाप्पा! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित, हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन संभवामि, युगे–युगे असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य–नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं, तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी, तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोचाराने जीवनातील दुख: संकटे, विघ्ने, अडचणी, प्रश्न, समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति–स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव, कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद–उपनिषद–रामायण–महाभारतातील, सत्याचा म्हणजे सत्य–शिव–सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति, सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस, त्यांची मनोकामना पूर्ण करतोस, त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस, तूच कर्ता–करवीता आहेस.

तुझ्या ठायी, ज्ञान–भक्ति आणि कर्मयांचा हृदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस, मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात, झाडे–फळे देऊन टाकतात, फुले सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सुर्य–चंद्रप्रकाश देतात. तूही ‘जो–जो वांछिले, तो तेलाहो’ म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान, रुढी, भेद-भाव, उच्च निंच पणा, वैमनस्य, दारिद्रय, दु:ख, दैन्य, दुबळेपणा, भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे, प्रेरणांचे अधिष्ठान, ही आजच्या समाजाची गरज आहे.

तुझ्या आगमनाने राज्याचे रुपांतर दहा दिवसांकरीता अक्षरश: तिर्थक्षेत्रात होते, अख्खा महाराष्ट्र ढवळून निघतो. सारेजण धर्म–भाषा, जाती–पंथ प्रदेश असे सारे भेद विसरुन तुझ्या दर्शनाच्या रांगेत ‘भाविक’ येतो, या एकाच जातीचे असतात. मनाची क्षुद्रता गळून पडलेली असते, जीवनाला सुंदर करणारे आणि मनाला सुखी करणारे असे ते रुप बाप्पा सर्वांच्यापुढे असते. दु:खाचा, समस्या, संकटाचा विसर पडलेला असता. आनंद, उत्साह, चैतन्य यांनी रोम–रोम पुलकित झालेला असतो. एका तेजाची उपासना आपण करीत आहोत, या अनुभवातून सारे गणेश भक्त तुझ्या सानिध्यात आल्यावर जात असतात. तू बुध्दीचा देव आहेस, परमेश्वर म्हणजे ज्ञान अशी आमची भारतीय संस्कृती सांगते. आम्ही सारे आस्तिक आहोत. कारण आमची तुझ्या जागृत अस्तित्वावर श्रध्दा आहेत. पण तुझे सामर्थ्य असे अगाध आहे की, तुझ्या दर्शनाने नास्तिकांचे ही रुपांतर आस्तिकात होईल. पाप्याला आपल्या पापाची लाज वाटेल, भ्रष्टाचा ज्याला शरम वाटेल हा तुझा महिमा आहे, म्हणुन तू आमच्यासाठी वरदान आहेस. जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा गणेशोत्सव, सुरु करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्वप्नांची पूर्ती बाप्पा तूझे सेवक, सामाजिक बांधिलकेच्या भूमिकेतून करतांना पाहून आम्हा भक्तांचा हात अधिक देण्यासाठी आणि ऋण फेडण्यासाठी उतावीळ होतो.

अयोग्य कर्मापासून रोखतेही, मूर्तीपूजा हे मानसीक, बौध्दीक विकासाचे साधन हजारो वर्षापासून आहे. म्हणूनच बाप्पा तुझे ‘अस्तित्व’ चिरंतन आहे. हे ठाऊक असुनही आम्ही गणेश चतुर्थीला तुझी मूर्ती आनंदाने, अभिमानाने मिरवत देहभान विसरुन, गात–नाचत दहा दिवसांकरीता आणतो, आणि प्राणांच्या ज्योती करुन तुझ्या तेजाची आरती करतो. त्यासाठी आम्हाला तू मूर्तीरुपात हवा असतोस. तू विराट विश्वंभर आहेस, पण आम्ही तूझे पाईक आहोत. आमचे सर्व संकटापासुन ती येण्या आधीच रक्षण–निवारण कर आम्हाला सुख–समाधान, मन: शांती, आरोग्य, समृध्दि, समता–बंधुता–न्याय लाभू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना!

**************

प्रविण बागडे
जरीपटका, नागपूर – १४
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# आभासी नोकर्यांचं जाळं

शिकलेले लोक नोकरीच्या आमिषाने फसवणुकीला बळी पडतात, हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. आपली फसवणूक होऊ शकते, असा विचार जरी डोक्यात आला, तरी तुम्ही सावध होऊ शकता.

बनावट नोकरी देणार्या टोळीकडून तरुणांना चार कोटी रुपयांना गंडवलं, अशी बातमी! हे तरुण शिकले–सवरलेले उच्चविभूषित! आई–वडिलांनी लाखो रुपये खर्च करून त्यांना शिकवलं. पण त्यांनी परिपूर्ण विद्या आकलन केली का? अर्थात त्यांनी ती प्राप्त केली का? सजग भारतीय नागरिक म्हणून समाजात वावरू शकले का? असे प्रश्न उद्भवतात.

महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे, ‘इतके अनर्थ एका अविद्येने केले’. होय, कारण की शिक्षण घेऊन असे तरुण बनावट व खोट्या नोकर्या देणार्यांच्या टोळ्यांचे सावज होत आहे. लाखो रुपये देऊन स्वतः हून फसवणूक करून घेतात. मग त्यांना अशा घोटाळ्यापासून खरं–खोटं/ लबाड/फसवणूक/गंडवणे/ माहिती नव्हते का? म्हणजेच ते शिकले–सवरलेले असूनसुद्धा व्यावहारिक व सामाजिक ज्ञानामध्ये ते नक्कीच अडाणी आहेत. डोक्यामध्ये अविद्याच भरलेली आहे, अशातला हा प्रकार आहे. व्यवहारसाक्षरता व अर्थसाक्षरतासुद्धा शिकले पाहिजे. यामुळे तरुणवर्ग यापुढे अशा मोहजालापासून दूर राहील.



विकास तंत्रज्ञान/लोकभावना/ आवडीनिवडी/झटपट फॅशन बदल/ नवनिर्मिती यामध्ये प्रचंड बदल जगात जाणवतो. नेमका हेच विद्या घेणारे शिक्षण पद्धतीनुसार पूर्ण ज्ञानाला वंचित राहतात. चकाचक राहणीमान/बडेजाव/बाह्य सौंदर्य प्रदर्शन/मोठेपणाचा/भौतिक सुख व समृद्ध याची भोगी वृत्ती ही आज तरुणांना भुरळ घालते. त्यामुळे झटपट श्रीमंत/ताबडतोब मोठ्या पगाराच्या नोकर्या याचे मार्ग शोधत फिरतात.

कष्ट करण्यास कोणी धजावत नाही आणि मग पैसे देऊन असले शॉर्टकट मार्ग तरुण शोधतात. मग जाळं विणणारी व फसवणूक करणारे स्कॅमर बरोबर अलगदपणे अशा तरुणांना भुरळ पडेल अशी जाहिरात करतात, डायरेक्ट ऑर्डर घ्या! भरतीपूर्व परीक्षेची जरूर नाही! मेरीटची जरूर नाही! पगारही भरपूर मिळेल! या आमच्याकडे आम्ही नोकरीला लावतो, तुमच्या आयुष्याची चिंता मिटून जाईल. अशी जाहिराती करून आपला कार्यभाग उरकून टाकतात.

बदल हा निसर्ग नियम आहे. जेवढा विकास होतो त्याच पटीमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती लोकांमध्ये बळकावत चालते. नोकरी शोधणार्यांची संख्या वाढली तशीच त्यांना फसवणार्यांची संख्याही वाढत आहे. पुरवठा अर्थात लोकांची मागणी पूर्ण करण्यासाठी खर्या–खोट्या प्लेसमेंट कंपन्या त्याचबरोबर ऑनलाइन स्कॅनर यांचेही अमर्याद पेव फुटले आहे.

फसवं जाळे टाकून ऑनलाइन वर्क/वर्क फ्रॉम होम/कमी वेळात नोकरी/जास्त पगार/हवी तशी सुट्टी/अशा आभासी स्वप्नरूपी आकांक्षासाठी तरुणांना भुलवले जाते. त्यांचे दलालसुद्धा वावरताना उच्च राहणीमान त्याचबरोबर संभाषण कौशल्य व प्रतिष्ठित लोकांसोबत काढलेले फोटो त्याचबरोबर मंत्री/मोठे अधिकारी यांची ओळख दाखवून आकर्षित केले जाते.

मोठ्या कार्पोरेट कंपन्यांना लाजवेल असे त्यांचे मॅनेजमेंट असते. यामुळे तरुण लवकरात लवकर त्यांच्या जाळ्यात अडकला जातो. खोटी नियुक्तीपत्र दिल्यानंतर सर्व माहिती त्या फसव्या लोकापर्यंत जाते. कागदपत्रेही त्यांच्यापर्यंत जातात. आपली संपूर्ण पार्श्वभूमी ते विचारून घेतात. त्यामुळे उमेदवाराकडून किती पैसे घ्यायचे आणि कुठपर्यंत याचा फास आवळायचा याचं मानसिक ज्ञान ह्या चोर लोकांना अवगत असतं. यामुळे नोकरी मागणारे सहजासहजी संमोहित करण्याची कला त्यांच्याकडे असतेच.

स्कॅमरला लाखो रुपये देऊन बसतात. तरुणांच्या ओळखीसाठी व मुलाखतीसाठी मोठी स्टार हॉटेल/स्कॅमर कंपनीतील लखलखीत दालने/त्यांचे राहणीमान/ उत्कृष्ट जेवणाची पद्धत/यामुळे भोळे तरुण अडकले जातात. सरकारी खात्याचे तसेच खासगी कंपनीचे नियुक्तीपत्र लेटरहेड वापरून उमेदवाराला मुलाखतीचे पत्रही देतात. पुढे थातूरमातूर कारण सांगून परत पैसे लुटले जातात. तुमच्या नियुक्तीच्या वेळेस अर्थात अपॉइंटमेंटला तुम्हाला पैसे द्यावे लागतील म्हणून पुनःपुन्हा पैशांची लूट चालूच राहते. जेव्हा पूर्ण पैसे लुटले जातात तेव्हा ते संपर्क, फोन नंबर, कार्यालय, ई–मेल सर्व काही बंद करतात आणि पळ काढतात.

त्यानंतर आपली फसवणूक झाली आहे हे या तरुणांच्या लक्षात येते. फसवणूक झालेले काही तरुण बदनामीमुळे तर काही अज्ञानामुळे गुपचूप राहतात व गप्प बसतात. पण काही थोडेफार पोलिसात तक्रार करतात; पण योजनेवरील ताण/ वाढती आर्थिक गुन्हेगारी/त्यातून दाखल होणारी असंख्य प्रकरणे/खटले यांचा ओघ जास्त असल्यामुळे पोलिसास ह्या गुन्ह्याचा तपास तडीस लावणे मोठे काम होऊन बसले आहे. डिजिटल सराईत घोटाळेबाज लोक असल्यामुळे अजून त्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

खरंतर एकदा गेलेला पैसा परत येणे महाकठीण हा अर्थव्यवस्थेचा नियम आहे. गुन्हे दाखल केल्यानंतरही पैसे मिळण्याचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने हा नियम लागू पडतो. आपल्या पात्रतेप्रमाणे काम करणे, सरकारी व खासगी संकेतस्थळ याची खात्री करून घेणे, नि:संकोचपणे तज्ज्ञाशी भेट घेऊन त्यांना या जाहिरातीबद्दल विचारणे, अर्थात नोकरीची प्रक्रिया समजून घेणे ही सर्व पडताळणी झाल्यानंतरच आपण नोकरीसाठी निश्चितच पात्र राहाल. सगळीकडे ऑनलाइन परीक्षा त्याचबरोबर प्रक्रियाही ऑनलाइन झाल्यामुळे सध्या तरी पारदर्शकता जाणवते. नोकरी देणारे, पैसे घेऊन वशिला लावणार्यांच्या आणि नोकर्यांच्या आभासी जाळ्यामध्ये अडकू नका.

# घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?.सागर तायडे.





तुम्ही बौद्ध आहात काय?. तुम्ही स्वताला बौद्ध समजता पण आचरण कसे करता. बुद्धाच्या पाय पडून पुजा केली पाहिजे की प्रचांग प्रणाम?. किती लोकांना यातील फरक माहिती आहे. म्हणूनच आज मी आपल्या समोर घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा हे सांगण्यासाठी उभा आहे.भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या बैठकीत सागर तायडे धम्म प्रचारक घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?. याबाबत ते बोलत होते.

घरात बसून बुद्ध उत्सव साजरा केला तर त्रिसरण,पंचशील यांचा अर्थ समजून घेता येईल.आणि त्यांचे आचरण घरातुन सुरू झाले तर तुम्ही कुठेही गेला तर ते संस्कार आपण विसरुच शकत नाही. हे संस्कार नसल्यामुळेच बुद्ध विहारे परिवर्तनांचे केंद्र झाले नाही. कारण विहिरीत नाही तर पोहऱ्यात कुठून येणार. दुःख आहे,त्याला कारण आहे त्यांचे निवारण करण्यासाठी उपाय सुद्धा आहे.त्यासाठी बुध्दांनी दाखविलेल्या मानवमुक्तीच्या मार्गाने आपणांस जावे लागेल. सात दिवस घरात बुद्ध उत्सव साजरा केला तर अनेक समस्यांचे निवारण करता येते. कसे ते समजून घेणे महत्वाचे असते. यानिमित्ताने मित्रमंडळी हितचिंतक नातलगांना आपल्या घरी बोलवा त्यांनी घरातील वातावरण पाहिल्यावर हमखास कुटुंबातील व्यक्तीची चौकशी केल्या शिवाय राहणार नाहीत.मग मुलामुलींचे,शिक्षण,नोकरी,आणि लग्न यांची माहिती विचारल्या शिवाय घरी आलेला माणूस शांतपणे जाऊच शकत नाही.हीच बुद्धांच्या विचारांची शक्ती आचरणातून दिसते. तीच सर्वश्रेष्ठ आचरण इतरांस प्रेरणादायी व लक्षवेधी ठरते. बुद्ध उत्सव घरात साजरा करणे निश्चितच हे एक लहान वाटणारे पण महान कार्य आहे. ह्यातून बौद्ध उपासक प्रेरणा घेऊन आपल्या घरी दररोज वंदना घेऊन आपल्या मुलांवर,नातूनातवांवर संस्कार करतील की आपण बौद्ध आहोत. बौद्धांच्या आचारसंहितेचे पालन केले पाहिजे. त्याने त्यांना धम्माचे संघांचे महत्व पाटल्या शिवाय राहणार नाही. जगातील एकशे चाळीस देशात सम्राट अशोक कालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला जातो.त्यामुळे त्या देशातील धम्म उपासकांची सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे. आपले आपल्या जिल्ह्यातील गांवचे काय?. बाबासाहेबांनी सांगितले होते खेडे सोडा,शहर गाठा.गावात लाचारीने मिळणारी भाकरी,आणि शहरातील स्वाभिमानाने मिळविलेली कष्टाची भाकरी फरक पडला की नाही.

जगातील बुद्ध धम्माचे उपासक हेच आचरण करत आहे. पण ते आपणास कळत नाही,कोणी सांगत असेल तर त्यावर आपण विश्वास ठेवत नाही.वंदना घेत नाहीत. अनेक लोक बौद्ध तत्वज्ञानाचा लाभ घेतात पण बुद्धाला वंदन करत नाहीत.आपले तसे नाही. संपूर्ण विश्व सुखी व्हावे हे आपले उद्दिष्ट आहे.ज्यामुळे सर्व सुखी होतील.पण घरात आपण शुद्ध बुद्ध नसलो तर बाहेर आपली ओळख काय करून ठेवली यांचे आत्मचिंतन करण्यासाठी घरा घरात सम्राट अशोक कालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला पाहिजे.कोल्हापुरच्या सिद्धार्थ नगर मधून आयु.देवदास बानकर संपादक दैनिक मुक्तनायक यांनी २०१५ पासून दहा वर्षापूर्वी सुरवात केली होती.गेल्या वर्षी तो घरा घरात बुद्ध उत्सव १८ जिल्ह्यात साजरा केला गेला.आता त्याचा जस जसा प्रचार व प्रचार होईल तस तसे धम्म उपासक उपासिका तो घरा घरात उत्सव साजरा करतील यावर्षी २८ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२५ असा सात दिवस हा बुद्ध उत्सव घराघरात साजरा केल्या जाणार आहे असे धम्म प्रचारक सागर रामभाऊ तायडे यांनी सांगितले.

भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या वतीने घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?. ही जन जागृती अभियान सागर तायडे धम्म प्रचारक अभ्यासक यांच्या मार्गदर्शनाखाली राबवित आहेत. त्यात तुळजाबाई इंगळे,चंद्रकला तायडे, सुनीता तायडे,कोकिळा बांगर,ज्योती थाटे,सुनीता गौतम तायडे,वंदना हिवराळे,विजया वानखडे,ह्या घरो घरी महिलांना एकत्र करून धम्मातील संघाचे महत्व सांगण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.गेल्या वर्षी माता रमाबाई आंबेडकर नगर,मध्ये आयू. सुनिल सोनताटे बौद्धाचार्य यांच्या नेतृत्वाखाली चाळीस पंचेचाळीस घरात आणि भीमनगर आंबेडकर नगरातील काही घरात बुद्ध उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला होता.यावर्षी त्यात मोठ्या संख्येने भर पडणार आहे. त्या दुष्टिने जन जागृती सागर तायडे धम्म प्रचारक अभ्यासक,आयु.सुनिल सोनताटे बौद्धाचार्य भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या वतीने केला जात आहे.

## महालक्ष्मीला(गौरीला) जन्म देणार सोनेसांगवी गाव केजच्या आकर्षक मुखवट्यांना महाराष्ट्राभरातून मागणी

महिलांना रोजगार
लक्ष्मी निर्मितीच्या उद्योगातून महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत पूर्ण वेळ मूर्ती तयार करण्याचे काम सुरू असते या व्यवसायामुळे आता महिला सक्षम होत आहेत.

मी बीड आयटीआय कॉलेजमध्ये व्यवसायीक प्रशिक्षण घेत आहे. सुट्टीच्या कालावधीमध्ये आई-वडिलांना व्यवसायामध्ये मदत करतो. रंगरंगोटी करणे ,पॅकिंग करणे इत्यादी कामे करतो.
ओंकार इटकर, सिद्धेश्वर इटकर
आय टी आय विद्यार्थी

कर्ज मिळायला हवे
या व्यवसायामध्ये वाढ होण्याकरिता विश्वकर्मा योजना किंवा अन्य योजनेमधून अशा कुटुंबीयांना कर्ज मिळायला हवे ज्यामुळे केवळ कौशल्य विकास वर खर्च होणारा पैसा या व्यवसायिकांच्या काम येईल

सोलापूर जिल्ह्यातून मोठी मागणी
शाडू माती प्लास्टर ऑफ पॅरिस पॅरिस पासून आम्ही तयार केलेल्या सुंदर आकर्षक महालक्ष्मीच्या मुखवट्यांना सोलापूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात मागणी आहे बार्शी येथील व्यापारी आमच्याकडे अगोदर बुकिंग करून नंतर मुखवटे घेऊन जातात.
कारागीर बळीराम त्रिम्बक इटकर

हातात लक्ष्मी नांदते आमच्या पिढ्यान पिढ्या चालत आलेली पारंपारिकता आम्ही टिकवली आहे. यामध्ये काही बदल करून लक्ष्मीचे मुखवटे, लहान मुखवटे ,कापडी हात बनवणे,गणेश मूर्ती,खेळणी असे बदल केले आहेत. या व्यवसायामुळे आमच्या हाती पैसा येऊन आमच्याही घरात लक्ष्मी नांदते आहे.कारागीर तथा माजी सरपंच सोनेसांगवी माणिकराव संतराम इटकर

आम्ही सुरुवातीला कलाकुसरीतून छोट्या मूर्ती बनवू लागलो. रोप लावले आणि आज बाजारपेठेमध्ये सर्वाधिक मागणी असणार आमचं गाव अशी ओळख झाली आहे.
गयाबाई इटकर

ग्रामीण भागातील सुरू असलेल्या या व्यवसायाला शासन दरबारी प्रोत्साहन देऊन चालना मिळायला हवी असे कारागीर बबन दिगंबर इटकर,नितीन बबन इटकर, धोंडीराम विश्वनाथइटकर,नामदेव इटकर,आश्रूबा इटकर यांनी सांगितले.

कामातून आनंद मिळतो.
आम्ही महालक्ष्मी बनवण्याचे काम करत असल्यामुळे आता आमच्या हाताला रोजगार मिळाला आहे शेतात अथवा इतर ठिकाणी मजुरीला जाण्याची गरज पडत नाही. या कामातून आनंदही मिळतो
अनिता इटकर



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सोनेसांगवी हे १९८० साली मांजरा प्रकल्पामुळे पुनर्वशीत झालेले गाव. अडीचशे कुटुंब, गावाची तेराशे लोकसंख्या असलेले गाव. त्यावेळी गावात रोजगार अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असे.गावातील दहा ते अकरा कुटुंब पारंपारिक गाडगे तयार करण्याचा व्यवसाय करत.जेष्ठ कारागीर माणिक इटकर संधी ओळखून लक्ष्मी मुखवटे, गणेश मूर्ती, बैल खेळणी तयार करण्यास सुरुवात केली. कलाकुसर शिकून गुणवत्तापूर्ण सुंदर मुखवटे तयार करण्यास अनेक कुटुंब पुढं आली. लक्ष्मीचे मुखवटेची आता प्रचंड मागणी वाढली आहे. सोनेसांगवी हे महाराष्ट्रातील अनेक भागात महालक्ष्मी मुखवट्यांचा पुरवठा करत आहेत महालक्ष्मी यांना जन्म देणाऱ्या गाव म्हणून सोने सांगवीकरांची ओळख होत झाली आहे.बाजारपेठेत या मूर्तींना मोठी मागणी आहे. ८० च्या दशकानंतर शेती व अन्य मजुरीची कामे मिळत नव्हती या काळात संधी ओलखली आणि अनेक कुटुंबाने या व्यवसायात कौशल्य विकसित केले. गुणवत्ता निर्माण केली. आज या कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला. दरवर्षी मोठ्या प्रमाणात यामधून नफा मिळत आहे. १० ते ११ कुटुंब ५५ ते ६० कुटुंबीय यांना आता या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळत आहे

## साधा भात खाऊन कंटाळा आल्यास दुपारच्या जेवणासाठी झटपट बनवा आंबट-तिखट लेमन राईस, नोट करा रेसिपी

महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात जेवणात भात खाल्ला जातो. भात आणि डाळ खाल्ल्याशिवाय जेवण झाल्यासारखे वाटत नाही. जेवणात भातापासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. फोडणीचा भात, मसालेभात, खिचडी किंवा भाताचे अनेक वेगवेगळे प्रकार बनवले जातात. मात्र जेवणात नेहमीच साधा भात खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी तुम्ही दुपारच्या जेवणासाठी लेमन राईस बनवू शकता. लिंबू आणि इतर मसाल्यांचा वापर करून बनवलेला भात दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर बनवला जातो. कोशिंबीर किंवा रायत्यासोबत लेमन राईस खाल्ला जातो. दुपारच्या जेवणात किंवा घरी पाहुणे आल्यानंतर काहीतरी वेगळा पदार्थ बनवायचा असल्यास तुम्ही साध्या भाताला सुंदर फोडणी देऊन लेमन राईस बनवू शकता. चला तर जाणून घेऊया लेमन राईस बनवण्याची सोपी कृती.

साहित्य:
- शिजवलेला भात
- कांदा
- आलं लसूण पेस्ट
- कोथिंबीर
- तेल
- लाल तिखट
- जिरं
- धणे
- कढीपत्ता
- शेंगदाणे
- मीठ



कृती: लेमन राईस बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये तेल गरम करून त्यात शेंगदाणे टाकून भाजून घ्या. शेंगदाणे काढून ताटात ठेवा.

गरम तेलात मोहरी, हिंग आणि कढीपत्ता घालून फोडणी तयार करा. त्यानंतर त्यात भाजलेलं शेंगदाणे आणि कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत मिक्स करा.

त्यानंतर त्यात आलं लसूण पेस्ट घालून व्यवस्थित भाजून घ्या. नंतर त्यात कोथिंबीर घालून मिक्स करा.

सर्व पदार्थ खमंग भाजून झाल्यानंतर त्यात हळद, लाल तिखट आणि धणे जिऱ्याची पावडर घालून मिक्स करून घ्या.

मसाले भाजल्यानंतर त्यात शिजवून घेतलेला भात घालून व्यवस्थित मिक्स आणि चवीनुसार मीठ टाका. ५ मिनिटं मंद आचेवर भात ठेवून नंतर त्यात लिंबाचा रस घालून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला लेमन राईस. हा भात कोशिंबीर किंवा सॅलडसोबत सुंदर लागेल.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्ह्याच्या वतीने शुभेच्छा देताना जिल्हा अध्यक्ष तथा प्रदोश उपाध्यक्ष अशोक देडे सोबत डिजिटल मीडिया प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे व लातूर मीडिया जिल्हाध्यक्ष मनीष हजारे दिसत आहेत.

## बाळांना साखर आणि मीठ का देऊ नये? डॉक्टरांचा योग्य सल्ला, कोणत्या वयात द्यावे पदार्थ

लहान बाळांना मीठ आणि साखर देणं योग्य आहे का? कधी मीठ-साखर लहान बाळ खाऊ शकते? डॉक्टरांचा महत्त्वाचा सल्ला लहान मुलांना काय, कधी आणि कसे खायला द्यावे यावर घरांमध्ये अनेकदा वाद होतात. आजी विशेषतः जुन्या अनुभवांवर अवलंबून असतात, तर डॉक्टर वैज्ञानिक माहितीच्या आधारे मार्गदर्शन करतात. मीठ आणि साखरेचे प्रकरणही असेच आहे.

डॉक्टर स्पष्टपणे म्हणतात की मुलाला एक वर्षापर्यंत मीठ किंवा साखर देऊ नये, परंतु वृद्ध लोक अनेकदा हे मानण्यास नकार देतात. पहिलं बाळ झाल्यावर घरातील आजी आणि नवजात आईमध्ये अथवा तिच्या सासूमध्ये असे वाद दररोज होत राहतात.

साधारण सहा महिन्यानंतर बाळाला अन्नपदार्थ देण्यास सुरूवात होते. त्यानंतर या वादालाही सुरूवात होते.

## केज शहरात घरोघरी गणरायाचे उत्साहात आगमन

केज/प्रतिनिधी गणेश चतुर्थी निमित्ताने यावर्षी देखील केज शहरामध्ये गणरायाचे आगमन अगदी थाटामध्ये झाले.हिंदु संस्कृतीमध्ये ऑगस्ट महिना प्रामुख्याने सण उत्सवाचा असतो.रक्षाबंधन झाले की,ऑगस्ट महिन्यात येणारा उत्साहाचा व आनंदाचा सण म्हणजे गौरी गणपती उत्सव. यावर्षी दि.२७-०८-२०२५ बुधवार रोजी घरोघरी गणपती बाप्पा चे आगमन आनंदात व मोठ्या उत्साहात झाले. गल्ली गल्ली मध्ये,घरोघरी लहान मुले व स्त्री पुरुषांची बाजारात जावून घरी गणपती बाप्पा ची मुर्ती आणण्यासाठी लगबग दिसून येत होती. केज शहरामध्ये बाजारपेठेत गणपती च्या आकर्षक व सुरेख मुर्ती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने बाजारपेठेत खरेदी साठी लोकांची गर्दी दिसून येत होती.शहरातील लोकांनी आनंदी वातावरणात भक्ती भावाने गणरायाची घरोघरी स्थापना केली.यावर्षी गणपती बाप्पा चा दहा दिवसांचा मुक्काम असून अकराव्या दिवशी अनंत चतुर्दशीला विसर्जन होणार आहे.



## चिंचोलीमाळीचे गणेश भक्त कारवर गणपती बसवून निघाले मुंबईला



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील गणेश भक्त हे कारवर गणपती बसवून मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे मागील दोन वर्षापासून मराठा समाज बांधवांना आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी सातत्याने आमरण उपोषणासह आंदोलन करत आहेत त्याचाच भाग म्हणून रंगे पाटील हे अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या रॅलीत केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील सहभागी झालेल्या युवकांनी आपल्या कारवर श्रीगणेशाची स्थापना करुन ते मुंबईकडे निघाले आहेत. अंतरवली सराटी येथुन मनोज जरांगेपाटील यांच्या रॅलीसाठी चिंचोलीमाळी येथून गेलेल्या गणेश भक्तांनी अंतरवाली येथेच कारवार गणपतीची स्थापना करुन मुंबईला जाण्याचा संकल्प केला आहे. यावेळी बाळासाहेब गलांडे, जितेंद्र देशमुख, पवन पवार, हरिभाऊ गायकवाड, दीपक नकाते, कैलास हुंबे ,गोरख गायकवाड, अतुल गायकवाड, भागवत नकाते,गौतम गलांडे, राजेभाऊ नखाते, संजय नखाते, शशिकांत पवार,महादेव हुंबे, जालिंदर हुंबे,रवी गायकवाड, महादेव गलांडे यांच्यासह चिंचोली माळीतील येथील शंभर पेक्षा जास्त मराठा समाजाचे युवक व नागरिक हे मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

## घरातील झुरळांना चुकीच्या पद्धतीने मारताय? आरोग्यासंबंधित वाढेल 'या' आजारांचा धोका, शरीराचे होईल नुकसान

घराच्या खिडकीमध्ये, किचन, सोफा, कपाट इत्यादी अनेक ठिकाणी झुरळ पाहायला मिळतात. घरात झुरळांची पैदास झाल्यानंतर ती कमी करण्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय केले जातात. पण झुरळांपासून सुटका करून घेण्याच्या नादात आपण अनेकदा परिस्थिती अधिकच बिघडवतो. कारण, चुकीच्या पद्धतीने झुरळ मारणे हे जिवंत झुरळापेक्षा अधिक हानिकारक असू शकते.डॉ. मुकेश संकलेचा, सल्लागार बालरोगतज्ज्ञ, बॉम्बे हॉस्पिटल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, यांनी याबद्दल सविस्तर माहिती सांगितली आहे. वैज्ञानिक अभ्यासातून असे दिसून आले आहे की, झुरळांमुळे ई. कोलाय, साल्मोनेला आणि स्टॅफिलोकोकस ऑरियस अशा हानिकारक रोगांचे संक्रमण होऊ शकते. नुसत्या हातांनी, पायांनी किंवा घरातल्याच गोष्टींनी आपण जेव्हा त्यांना चिरडतो, तेव्हा याच रोगांचे जीवाणू जमिनीवर आणि भिंतींवर पसरण्याचा धोका असतो. त्यातच आपण मारलेले झुरळ हे केवळ समोर दिसत असतात. ते जिथे लपलेले असतात किंवा त्यांची अंडी याकडे आपले दुर्लक्ष होते. आणि काही दिवसांत पुन्हा नवीन झुरळे दिसू लागतात. झुरळांचा नायनाट करण्यासाठी काही लोक स्वस्त उत्पादनांचा वापर करतात ज्यामुळे ऍलर्जी होण्याचा धोका असतो तसेच आरोग्य समस्या उद्भवू शकतात. काही लोक झुरळ किंवा कीटकांचा नाश करणाऱ्या अगरबत्तीसारख्या उपायांचा वापर करतात. मात्र, ते उपाय सुरक्षित नाहीत. अभ्यासातून असे समोर आले आहे की, अशा अगरबत्ती हनिकारक कर्करोगजन्य पदार्थ सोडतात. लहान किंवा जिथे हवा खेळती राहात नाही अशा घरांमध्ये, हा धूर मुले तसेच वृद्धांसाठी आरोग्याचे गंभीर धोके निर्माण करू शकतो. झुरळांना मारणारे खडू हा नेहमीच सोपा उपाय म्हणून ओळखला जातो. परंतु ते झुरळांवर कुचकामी ठरतात. झुरळांना घालवण्यासाठी याचा वापर करायचा म्हणजे अनेक पृष्ठभागावर रेषा माराव्या लागतात. जे दिसायला घाण तर दिसतेच पण ते आरोग्यासाठी देखील धोकादायक ठरू शकते. हे खडू वापरताना सहजपणे तुटू शकतात आणि त्याची पावडर उडू शकते. त्यामुळे ही पावडर हातांच्या संपर्कात येऊन ठिकठिकाणी पडू शकते. यामुळे देखील धोका होऊ शकतो. अधिक जाणून घ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी डेंटल इम्प्लांटची किंमत तुम्हाला आश्चर्यचकित करू शकते याशिवाय लिंबू, तमालपत्र आणि केरोसिनमध्ये भिजवलेले कापसाचे गोळे असेही मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे घरगुती उपाय आहेत. त्यांचा वास तीव्र असला तरी या पद्धती खरोखरच प्रभावी आहेत हे सिद्ध करणारे फारसे वैज्ञानिक पुरावे नाहीत. उलट अशा उपायांचा वापर केल्याने कधीकधी कीटक जिथे लपले आहेत तिथून अधिक आत, खोलवर जाऊ शकतात. स्मार्ट, सुरक्षित उपाय: प्रभावी, स्वच्छ आणि वैद्यकीयदृष्ट्या योग्य उपाय देखील अनेकदा स्वस्त असतात. जेल बेट्स हा सर्वात प्रभावी, स्वच्छ आणि शाश्वत उपाय मानला जातो. विज्ञानाने देखील याला पाठबळ दिले आहे. या जेलमध्ये फिप्रोनिलसारखे सक्रिय घटक असतात जे केवळ दिसणाऱ्या कीटकांवरच वार करत नाहीत तर त्याही पलीकडे जाऊन त्यांचे काम करतात.

# बेकायदेशीररित्या गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस मुद्देमालासह अटक.




लातूर:– बेकायदेशीररित्या गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस १,९३,५००/– रुपयाच्या मुद्देमालासह अटक.✻ याबाबत अधिक माहिती अशी की, आगामी सण उत्सव काळात शांतता अबाधित राखणे करिता पोलीस स्टेशन हद्दीत दहशत निर्माण करणारे, रेकॉर्डवरील गुन्हेगार, शरीराविरुद्ध गुन्हे करणारे गुन्हेगार, अवैधरित्या शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती काढून कार्यवाही करणेबाबत पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांचे सूचनेप्रमाणे जिल्हाभरात कार्यवाही सुरू असताना. पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एक पोलीस पथक पोस्टे हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती प्रमाणे नवीन रेणापूर नाका ते डी मार्ट येणारे रोडवर एक इसम याचे जवळ गावठी पिस्टल असल्याचे माहितीप्रमाणे सदर रोडवर सापळा रचून स्कुटीसह थांबलेले इसमाकडे असणारी स्कुटी क्रमांक चक २४ –छ ३२४० डिग्गीची पाहणी केली असता डिग्गी मध्ये गावठी पिस्टल आढळून आले नमूद इसमाला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव १) अलोक विश्वनाथ चौधरी वय ३६ वर्ष रा. आंबा हनुमान जवळ अंबाजोगाई रोड लातूर असे सांगितले वरील इसमाला ताब्यात घेतले असता त्याच्याकडे एक गावठी पिस्टल व १७ जिवंत काडतुसे मिळून आले सदर पिस्टल व काडतुसांचे परवाना बाबत विचारपूस केली असता परवाना नसल्याचे सांगितले त्यास पोलीस पथकाने ताब्यात घेऊन त्याच्याकडून बेकायदेशीररित्या पिस्टल बाळगले संदर्भाने एकूण १,९३,५००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे पुढील तपास पोउपनि सचिन रेडेकर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोस्टे चे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकातील पोउपनि सचिन रेडेकर पोलीस अंमलदार खुर्रम काझी,यशपाल कांबळे, रणवीर देशमुख,गणेश यादव,धैर्यशील मुळे, सचिन राठोड,आनंद हल्लाळे यांनी केली आहे.

# साहित्यिक उत्तम तरकसे यांची कोमसापच्या सल्लागार पदी नियुक्ती



नवी मुंबई:– पनवेल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या नवीन कार्यकारणीची निवड करणे बाबतचे दि २१/०७/२५ च्या केंद्रीय कार्यालयाच्या पत्रानुसार कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल ची२०२५ ते २०२८ अशी तीन वर्षाकरिता नवीन कार्यकारणी स्थापन करण्यात आली असून सदर नवीन कार्यकारणी मध्ये अध्यक्ष म्हणून श्री सुभाष कुडके,उपाध्यक्ष मा नागनाथ डोलारे. (सचिव) विजय गायकर (खजिनदार) काशिनाथ जाधव (जिल्हा प्रतिनिधी) विशाल पवार (युवा प्रमुख) सौ तारे मॅडम तसेच (सदस्य) शिवाजी मोठे, हिरवे असी नवीन कार्यकारणी स्थापन करत सल्लागार म्हणून मा श्री उत्तमराव दासु तरकसे (महा शासनाचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) एड सुनिता जोशी श्री रोहिदास पोटे (समीक्षक गझलकार) ए के शेख (गझलकार) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करत



नवनिर्मित कार्य करणी स्थापन करण्यात आली

# कळंब येथे वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक संपन्न. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्व ताकतीनिशी लढणार-ड.प्रणित डिकले

कळंब/प्रतिनिधी कळंब येथील शासकीय विश्रामगृह येथे वंचित बहुजन आघाडीची महत्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका वंचित बहुजन आघाडी हा पक्ष ताकतीनिशी लढणार आहे असे बैठकीनंतर माध्यमांशी बोलतानाड. प्रणित डिकले यांनी म्हटले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक २७ ऑगस्ट २०२५वंचित बहुजन आघाडी, कळंब तालुक्याच्या वतीने पक्ष संघटन आढावा बैठकीचे आयोजन हे कळंब येथील शासकीय विश्रामगृह येथे करण्यात आली होते. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष ड.प्रणित डिकले,जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आढावा बैठक संपन्न झाली. संभाव्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडी पक्षाची कळंब तालुका संघटनात्मक बांधणी, पक्षाची ताकद व पक्षाचे ध्येय धोरण यासह विविध विषयावर चर्चा करून संपूर्ण आढावा याप्रसंगी घेण्यात आला. कळंब येथील शासकीय विश्रामगृहा मध्ये वंचित बहुजन आघाडी पक्षाची कळंब तालुक्यातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची बैठक तालुक्यातील राजकीय परिस्थिती व संभाव्य नगरपंचायत,नगरपरिषद,पंचायत समिती,जिल्हा परिषद निवडणुकांच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या कार्यकर्ते पदाधिकाऱ्यां सोबत व्यापक स्वरूपात बैठक संपन्न झाली.या बैठकीसाठी पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.प्रणित डिकले,जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के,जिल्हा उपाध्यक्ष अरुण गरड,रुस्तमखा पठाण,जिल्हा प्रवक्ते शिवाजी कांबळे,जिल्हा संघटक डॉ.बाळासाहेब चंदनशिवे,सचिव अमोल शेळके,महिला आघाडी च्या संगिताताई गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कळंब तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका वंचित बहुजन आघाडी सर्व ताकदीनिशी लढण्याचा निर्धार करण्यात आला वंचित,शोषित, पीडित समाज घटकांच्या न्याय हक्क अधिकारांसाठी लढणारा वंचित बहुजन आघाडी हा एकमेव पक्ष आहे सातत्याने निवेदने आंदोलने पक्षाच्या माध्यमातून करून पक्ष कायम सर्वसामान्यांच्या बाजूने उभा राहतो सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वंचित बहुजन आघाडी लढवणार असा निर्धार या बैठकीमध्ये करण्यात आला याप्रसंगी



बि.डि.शिंदे,प्रा. अरविंद खांडके,लक्ष्मण धावारे,मेजर विठ्ठल हजारे,भिकाजी आव्हाड,रसूल खान,सनी मस्के,महादेव पायाळ, उपसरपंच वैजनाथ डोंगरे,परमेश्वर कसबे,सचिन सावंत,रघुभाऊ ओव्हाळ,प्रशांत धावारे,सुधीर वाघमारे,अंकुश वाघमारे,बापूराव जोगदंड,धीरजगायकवाड,धनराज नाईकवाडी,किरण नाईकवाडी,गणेश साखळे,युवा नेते विशाल वाघमारे, सचिन सावंत,मल्हारी गायकवाड, उत्तम सावंत, वंचित बहुजन महिला आघाडी च्या संगिता गायकवाड,प्रतिक्षा सावंत,मंजुताई सावंत,सुदामती गरड यांच्यासह वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा,संमता सैनिक दल यांचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिवाजी कांबळे यांनी केले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण गरड यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.बाळासाहेब चंदनशिवे यांनी मानले.

# व्यसन मुक्ती सम्राट : जितेंद्र मुंडकर यांचा चिंचपाडा पनवेल येथे सहृदय सन्मान.

नवी मुंबई / ( पनवेल प्रतिनिधी ) :– कै. दि. बा. पाटील ज्येष्ठ नागरिक संस्था चिंचपाडा सेक्टर – २, पनवेल शहर नवी मुंबई यांच्या वतीने व्यसन मुक्ती सम्राट : जितेंद्र मुंडकर यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात उपस्थितांनी व्यसनमुक्त भारत करण्याचा विडा उचललेले समाजसेवक – जितेंद्र मुंडकर यांचे मनापासून कौतुक केले, जितेंद्र मुंडकर यांचे अख्खे जीवन व्यसनमुक्ती व सामाजिक कार्यात समर्पित आहे. महाराष्ट्रभर दौरा करून जितेंद्र मुंडकर सरांनी रायगड जिल्हा परिषद अलिबाग समाज कल्याण विभाग अंतर्गत व्यसनमुक्ती अभियान राबवण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यांना आमचा जाहीर पाठिंबा आहे त्यांच्या हातून असेच सामाजिक कार्य घडो अशा शब्दात अनेक मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. जितेंद्र मुंडकर यांचा ग्रामीण भागातील लोकांशी दांडगा संपर्क आहे. ग्रामीण भागात दौरा करून हे आज चिंचपाडा पनवेल शहरात विविध ठिकाणी उपस्थित राहून समाज प्रबोधन करत आहेत, व्यसना पाई मानवी जीवन कसे उध्वस्त होते, व्यसन किती खतरनाक बाब आहे, व्यसना मुळे मानवी जीवन सीमित होते. व्यसनी माणसा मुळे त्यांचे पूर्ण कुटुंब नेस्तानाबुत होते, आई वडील, पत्नी मुलाबाळांना त्याची झळ सोसावी लागते ते ग्रामीण व शहरी भागात जाऊन आपल्या प्रबोधनातून लोक जागृती करीत असतात. शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन रायगड जिल्हा परिषद अंतर्गत त्यांना हे अभियान राबवण्याचे मोलाचे कार्य मिळाले आहे. त्यांनी आता पर्यंत अख्खा महाराष्ट्र फिरून हजारो लोकांना व्यसनापासून मुक्त




केले आहे, सदगुरू कर्मयोगी संत गाडगेबाबा व जीवदया प्रेमी व्यसनमुक्ती सम्राट कर्मयोगी संत दिलीप बाबा यांना ते आपले प्रेरणास्थान मानतात. त्यांच्या सोबतीला आदर्श पोलीस अधिकारी : मा. श्याम कदम साहेब व सामाजिक, धार्मिक क्षेत्रात तत्परतेने अग्रेसर असणारे नवी मुंबई कल्याणराव हनवते सदैव त्यांच्या सोबत व्यसन मुक्ती कार्य करण्यास मदत करीत आहेत पनवेल शहर चिंचपाडा परिसरातील असंख्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. सदर समाज प्रबोधन कार्यात व्यसन मुक्ती चे व ज्या ज्या महापुरुषांनी आपले अख्ये आयुष्य समाज सुधारण्यासाठी खर्ची घातले त्यांचे नारे दिले. संत गाडगे बाबा जी की जय हो..! संत दिलीप बाबा जी की जय हो..! इत्यादी नारा देऊन सारा परिसर दणाणून सोडला.

# रुद्रापुर ग्रामपंचायतीचे कमलाकर जमदडे उपसरपंच पदी निवड



बिलोली तालुक्यातील रुद्रापुर ग्रामपंचायतीत नुकत्याच झालेल्या विशेष सभेमध्ये एकमताने श्री. कमलाकर चंद्रकांत जमदडे यांची उपसरपंच म्हणून निवड करण्यात आली. या निवडणुकीचे अध्यक्षस्थान मा. सरपंच श्रीमती शेषाबाई भिमराव नलगोंडे यांनी भूषविले. ग्रामविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने ही निवड प्रक्रिया पार पडली. सर्व सदस्यांनी एकमताने प्रस्ताव मांडून त्यांना उपसरपंच पदाचा मान दिला. पदग्रहण सोहळ्यात जमदडे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून पदभार स्वीकारला. विचारवंतांच्या स्मृतीला अभिवादन करून पदग्रहण केल्यामुळे कार्यक्रमास वैचारिक व विवेकवादी अधिष्ठान मिळाले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य राजु गायकवाड, अर्जुन शेळके, सौ. गिण्यानबाई लक्ष्मण बुडावाड, सौ. लक्ष्मीबाई शेळके, सौ. कविता देविदास डोरणेवाड, सौ. महानंदा अशोक शेळके यांनी एकमुखी सहमती दर्शवून नव्या उपसरपंचांचा सत्कार केला. तसेच ग्रामपंचायत कर्मचारी प्रभाकर सोगे (ग्रामपंचायत अधिकारी),नागा बाबा शेळके माजी सरपंच, शिव शंकर पाटील जमदडे, शिवाजी मोहनराव जमदडे, नागनाथ नलगोंडे, नरसिंग सोळंके,तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद शेळके, सिद्राम पा.मुंके,सतीश नारलावाड, गणेश इंद्राक्ष, रंजीत मंगरुळे, सूर्यकांत मंगरुळे,गंगाराम पा.जमदडे,कृष्णा पाटील,रशिदबेंग महेबुबबेंग (सेवक),बुद्धभुषण गायकवाड (प. पू. सेवक) व समस्त गावकरी उपस्थित होते. आपले मनोगत व्यक्त करताना जमदडे म्हणाले, ग्रामपंचायतीत पारदर्शकता, गावातील मूलभूत सुविधा, तरुणांसाठी रोजगारनिर्मिती, महिला सबलीकरण, सामाजिक समता आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे हेच आपले प्राधान्य असेल. समता, बंधुता व लोकशाही मूल्यांवर आधारलेले कार्य करण्याचा माझा निर्धार आहे. या निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या सभागृहात आनंदाचे वातावरण पसरले होते. गावकऱ्यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई येथे भारतीय बौद्ध महासभेचा २८ वा वर्धापन दिन साजरा डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या उपस्थितीत धम्म परिषद मोठ्या उत्साहात संपन्न

> हल्लीचे सरकार हे गेल्या २०१४ पासून (ईव्हीएम) मध्ये गडबडी करून सत्तास्थानी विराजमान झालेल सरकार आहे, लोकांनी (भाजप) वर विश्वास केला पण यांनी लोकशाहीचाच विश्वासघात केला, सर्व सरकारी शाळा बंद पाडुन गरिबांना शिक्षणापासून वंचित केले, सर्वत्र खाजगीकरण करून सर्व क्षेत्रांमध्ये महागाई वाढवली. महाराष्ट्र ते दिल्ली पर्यंत भ्रष्टाचार ही भ्रष्टाचार आपण सारे उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत,
> २०१४ पासून एडव्होकेट : प्रकाश आंबेडकर हे (ईव्हीएम) चा मुद्दा घेऊन न्यायालयीन लढाई लढत आहेत, बिहार येथील महाबोधी बुद्ध विहार ब्राह्मण मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्या..! बी.टी ॲक्ट १९४९ रद्द करा..!! हे आंदोलन भारतासह आंतरराष्ट्रीयस्थरापर्यंत पेटले आहे. इत्यादी प्रश्न आज आपण सुप्रीम कोर्टात पोहोंचलेले आहेत आणि आपण सारे न्यायाच्या प्रतीक्षेत आहोत
> –– डॉ. भीमराव आंबेडकर

> दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने भारतीय बौद्ध महासभेचा २८ वा वर्धापन दिन व एक दिवशीय धम्म परिषद कोपरखैरणे नवी मुंबई येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी पत्रकारांचा यथोचित गौरव करताना भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ. भीमराव भैय्यासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र

नवी मुंबई / के. एच. हनवते :– भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने २८ वा वर्धापन दिन व धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक : डॉ. भीमराव भैय्यासाहेब आंबेडकर (दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष) डॉ. भीमराव आंबेडकर हे प्रामुख्याने उपस्थित होते त्यावेळी या कार्यक्रमास संबोधित करताना डॉ. भीमराव आंबेडकर म्हणाले की, सध्या देशात महाबोधी बुद्ध विहार ब्राह्मण मुक्त करा, बी.टी. क्ट – १९४९ कायदा रद्द करा हे आंदोलन आता सर्व भारतभर पेटलेले असुन याचे पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचलेले आहे याचा विचार अता या देशातील सरकार सह सुप्रीम कोर्टाने करावा आणि बिहार येथील बोध्दगया महाबोधी बुद्ध विहार ब्राह्मण मुक्त करून ते बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीने सर्वत्र जोर धरलेला आहे याचा विचार करून योग्य तो न्यायनिवाडा करावा तसेच डॉ. भीमराव आंबेडकर म्हणाले की, सध्या देशात (ईव्हीएम) हॅक करून देशातील लोकशाही संपुष्टात आणली जात आहे हे आपल्या देशातील लोकशाहीला घातक आहे आणि म्हणून आम्ही संविधान प्रेमी नागरिकांनी आता रस्त्यावरची लढाई लढली पाहिजे, गेल्या २०२४ पासून : प्रकाश आंबेडकर हे सातत्याने ईव्हीएम च्या संदर्भात आवाज उठवत आहेत आणि याचा न्यायनिवाडा करण्याचा प्रश्न आता सुप्रीम कोर्टामध्ये पोहोचलेला आहे पण या संदर्भात न्याय देण्यासाठी या देशातील जातीवादी व्यवस्था जाणून बुजून टाळाटाळ करीत आहे, कारण त्यांना पुन्हा या देशांमधील जनतेवर




मनूवादी व्यवस्था (ईव्हीएम) हॅक करून या देशातील लोकशाही संपुष्टात आणण्याचा डाव आहे हे आता जनतेच्या सर्व लक्षात आले आहे आणि म्हणून याला सर्वत्र कडाडून विरोध केलाच पाहिजे आणि त्यासाठी भारतीय बौद्ध महासभे सह वंचित बहुजन आघाडी सर्व देशभर जन आंदोलन करणार..! जातीवाद्यांचे मनसुबे आम्ही हाणून पाडणार, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेचे संस्थापक : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले शिका, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करील तो एक ना एक दिवस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही..! हेच तर येथील जातीवादी सरकारला हजम होत नाही म्हणून तर सरकारी शाळा बंद पडल्या जात आहेत, ज्यानेकरून गोरगरिबांची मुले शिक्षण शिकु नये त्यांनी परत आमची गुलामीच करावी असे यांचे डावपेच आहेत आणि ते आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असा गर्भित इशारा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव भैय्यासाहेब आंबेडकर यांनी दिला, नवी मुंबई कोपरखैरणे येथील भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने घेतलेल्या २८ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात आपले प्रखर विचार मांडले. या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे चैत्यभूमी पूज्य भंते : विशुद्धी बोधी तसेच महाराष्ट्र पदाधिकारी : डॉ. एस. के. भंडारे गुरुजी, बी एच. गायकवाड गुरुजी, डॉ. एस. एस. वानखडे गुरुजी, भिकाजी कांबळे गुरुजी, रागिणी ताई पवार, सुषमाताई पवार, युजी बोराडे गुरुजी, स्वातीताई शिंदे, अशोक केदारे गुरुजी, प्रशांत गडकरी गुरुजी, जयवंत लव्हांडे गुरुजी, व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : नामदेव जगताप गुरुजी, प्रकाश माने (कोषाध्यक्ष), विजय झनके (उपाध्यक्ष–संस्कार), महिला जिल्हाध्यक्ष : शोभाताई कांबळे, संजय झनके (सरचिटणीस), विनोद पाचपांडे गुरुजी, कविताताई कांबळे, अलकाताई आढाव, आणि संपूर्ण नवी मुंबईतील भारतीय बौद्ध महासभेचे आजी–माजी पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, केंद्रीय शिक्षिका, बौद्धाचार्य यांनी खूप मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल सर्वांचे मनः पूर्वक जाहीर आभार या सर्व कार्यक्रमाचे भारदस्त व शानदार सूत्रसंचालन : संजय झनके गुरुजी यांनी केले शेवटी सरणतय गाथा घेऊन कार्यक्रम संपन्न केला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE